# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
# सन 2018-19 साठी रेती/वाळू लिलावाकरिता ई-निविदा व ई-ऑक्शन सूचना
# (तिसरी फेरी)

**जा.क्र.2019/महसूल/गौ.ख./टे-1/प्र.क्र.06**
**जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड**
**दिनांकः- 16/03/2019**

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन(विकास व विनियमन) नियम,2013 मधील नियम 70 व शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्र.गौखनि 10/0615/प्र.क्र.289/ख,दि.03 जानेवारी,2018 मधील तरतुदीनुसार दरवर्षी जिल्ह्यातील शासकीय रेती गटांची निर्गती लिलावाद्वारे करावयाची आहे.

**2.** त्यानुसार, **राज्यस्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) यांनी 156 व्या बठकीमध्ये 29 रेतीगटांना राज्यस्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) च्या दि.19/02/2019 पत्रान्वये पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. सदरील पर्यावरण अनुमती व राज्य शासनाच्या पुढील निर्देशाच्या अधीन राहुन 15 वाळू गटांचे** निविदेतील अट क्र. 37 मध्ये नमुद केलेल्या कालावधीकरिता **तिस-या फेरीसाठी** ई निविदा व ई ऑक्शनद्वारे लिलाव करण्यात येत आहेत. वाळू लिलावाच्या अटी/ शर्ती, वाळू गटाची हातची किंमत व ईतर सर्व माहिती गौण खनिज शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड,जिल्ह्यातील सर्व तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात तसेच https://co.maharashtra. nextprocure.in आणि www.nanded.nic.in या वेबसाईट/संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

3. सदर निविदेसंबंधी Pre Bid Conference **दि.22/03/2019 रोजी सायं.5.00 वाजता** जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे घेण्यात येईल.

**3.** ई निविदा व ई ऑक्शन पध्दतीने रेती/वाळू लिलाव करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चीत करण्यात आले आहे.

| Sand E-Tender and E-Auction Schedule for Nanded Collector Office | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Department Stage** | **Start Date** | **Time** | **End Time** | **Time** |
| 1 | Tender Download | 19-03-2019 | 10.00 | 30-03-2019 | 23.00 |
| 3 | Bid Submission | 19-03-2019 | 10.00 | 30-03-2019 | 23.00 |
| 4 | Technical Bid Opening | 01-04-2019 | 11:00 | 01-04-2019 | 17.00 |
| 5 | e-Auction | 03-04-2019 | 11:00 | till end of auction | |
| 6 | Price Bid Opening | after Completion of E-Auction Process | | | |

**जिल्हाधिकारी, नांदेड**

# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
# रेती/वाळू लिलावाकरिता ई-निविदा व ई-ऑक्शन सूचना
# (तिसरी फेरी)

---

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन(विकास व विनियमन) नियम,2013 मधील नियम 70 व शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्र.गौखनि 10/0615/प्र.क्र.289/ख, दि.03 जानेवारी, 2018 मधील तरतुदीनुसार दरवर्षी जिल्ह्यातील शासकीय रेती गटांची निर्गती लिलावाद्वारे करावयाची आहे.

**2.** त्यानुसार, **राज्यस्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) यांनी 156 व्या बठकीमध्ये 17 रेतीगटांना राज्यस्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) च्या दि.19/02/2019 पत्रान्वये पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. सदरील पर्यावरण अनुमती व राज्य शासनाच्या पुढील निर्देशाच्या अधीन राहुन 15 वाळू गटांचे** निविदेतील अट क्र. 37 मध्ये नमुद केलेल्या कालावधीकरिता **तिस-या फेरीसाठी** ई निविदा व ई ऑक्शनद्वारे लिलाव करण्यात येत आहेत. वाळू लिलावाच्या अटी/शर्ती,वाळू गटाची हातची किंमत व ईतर सर्व माहिती गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, जिल्ह्यातील सर्व तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात तसेच https://co. maharashtra.nextprocure.in आणि www.nanded.nic.in या वेबसाईट / संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

**3.** ई-निविदा(e-tendering) व ई लिलाव(e-auction) प्रक्रियेत भाग घेणा-यांना वैध डिजिटल सिग्नेचर आवश्यक राहील. नव्याने डिजिटल सिग्नेचर मिळविण्याकरिता पॅनकार्ड, वाहन परवाना, पासपोर्ट साईजचा फोटो यांच्या हार्ड कॉपीज सक्षम प्रमाणीकरण प्राधिकरणास(Certifying Authority)सादर करुन डिजिटल सिग्नेचर मिळविता येईल.

**4.** वाळु लिलाव प्रक्रिया ही ई-निविदा(e-tendering) व ई ऑक्शन(e-auction) या दोन्ही प्रक्रियांद्वारे राबविली जाईल.ई-निविदा(e-tendering) प्रक्रीयेत भाग घेत असताना संबंधिताने https://co.maharashtra. nextprocure.in या वेबसाईटवर ई-निविदा खरेदी करावी. **ई-निवीदा/ई-ऑक्शनमध्ये भाग घेणा-यांनी Technical Bid मध्ये पात्र ठरण्यासाठी आयकर नियमित भरत असल्याचा पुरावा (मागील वर्षाचे आयकर विवरणपत्र), पॅनकॉर्ड, GST विभागात नोंदणी केलेला नोंदणी क्रमांक/विक्रीकर विभागाचा TIN क्रमांक कागदपत्रे व रेतीघाटाच्या हातची किंमतीच्या 25% रक्कम EMD स्वरुपात भरणे बंधनकारक आहे. ज्या व्यक्ती सदरची कागदपत्रे जोडणार नाहीत त्यांना ई-निवीदा अथवा ई-ऑक्शनमध्ये भाग घेण्याकरीता अवैध ठरविण्यात येईल.** तसेच यासोबत ई-निविदा(e-tendering) प्रक्रियेत भाग घेणा-यांनी त्यांची वैयक्तीक माहिती (जसे, नाव, पत्ता, वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल नंबर) रहिवाशी दाखला, कंपनी/फर्म असल्यास रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, रेतीघाट ई निविदा/ई ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रु.100/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह इत्यादि कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.

**5.** ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000/-(अक्षरी रुपये दहा लाख) व त्यापेक्षा जास्त असेल अशा वाळू गटासाठी अर्ज फी रु.5,000/-(रुपये पाच हजार फक्त) ऑनलाईन भरावी लागेल. ज्या वाळू गटासाठी हातची किंमत रुपये 10,00,000/-(अक्षरी रुपये दहा लाख) पेक्षा कमी असेल अश्या वाळू गटासाठी अर्ज फी रुपये 2,000/-(रुपये दोन हजार फक्त) ऑनलाईन भरावी लागेल.

**6.** लिलावासाठी प्रसिध्द केलेल्या वाळूगटाच्या हातच्या किंमतीवर भरावयाची अनामत रक्कम निश्चित केली आहे व ती प्रसिध्द केलेली आहे. अनामत रक्कम Debit Card/Credit Card/Net Banking/ NEFT/RTGS या माध्यमातुनच जिल्हाधिकारी,नांदेड यांचे ICICI बँक खात्यावर जमा करणे आवश्यक आहे.

**7.** E-tendring च्या बोलीच्या कालावधीत संबंधितास त्यांची बोली अपलोड करता येईल. ऑनलाईन वेळापत्रकानुसार Bid Submission व Service Provider fee रु.750+GST+applicable payment gateway charges Debit Card/Credit Card/ Net Banking द्वारे Nextenders India Pvt.Ltd. यांचे खात्यामध्ये जमा करावी व Online Bid Submission Stage पूर्ण केल्यानंतरच त्यांची ई-निविदा (e-tendering) जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सादर होईल.

**8.** E-tendering च्या प्रक्रीयेमध्ये टेक्नीकल बीड ओपनिंग (Technical Bid Opening) चा दिनांक व वेळ नमुद केलेली आहे. Technical Bid उघडल्यानंतर नियोजित वेळापत्रकानुसार ई-ऑक्शन (e-auction)प्रक्रिया सुरु होईल. ज्यांना ई-ऑक्शनमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांना https://co.maharashtra.nextprocure.in या Website वर जाऊन ऑनलाईन बोली टाकता येईल. त्यापुर्वी त्यांना Service Provider fee रु.1000/- +GST+applicable payment gateway charges (प्रति रेतीगट) Debit Card/ Credit Card/Net Banking द्वारे भरणा करावी लागेल.

**9.** टेक्नीकल बीड ओपनींग(Technical Bid Opening) नंतर ज्या व्यक्तीची कागदपत्रे परिपूर्ण असतील तेच ई-निविदाधारक पुढील प्रक्रियेसाठी पात्र राहतील. जे ई-निविदाधारक टेक्लीकल बीड ओपनींगमध्ये पात्र राहतील अशाच ई-निविदाधारकांना ई-ऑक्शन(e-auction) मध्ये भाग घेता येईल. ई-ऑक्शननंतर दिनांक व वेळ नमुद केल्याप्रमाणे प्राईस बीड ओपन(Price Beed Open) करण्यात येईल.

**10.** ज्यांना एकापेक्षा जास्त गटासाठी ई-निविदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी प्रत्येक गटनिहाय स्वतंत्रपणे अर्ज फी व अनामत रक्कम, Service Provider fee जमा करणे आवश्यक राहील. या रक्कमा स्वतंत्रपणे वर नमुद केलेल्या पध्दतीने जमा कराव्यात. एकत्रित रक्कम जमा करु नये. तसेच प्रत्येक गटासाठी आवश्यक कागदपत्रे स्वतंत्रपणे अपलोड करावीत.

**11.** तसेच ज्यांना एकाच वाळू गटासाठी ई-निविदा तसेच ई-ऑक्शन या दोन्ही प्रक्रियांमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांना त्याच वाळू गटासाठी ई-टेंडरींग नंतर ई-ऑक्शनसाठी अनामत व अर्ज फी पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही. परंतु, त्यांना Service Provider fee गटनिहाय रक्कम रुपये 1000/-+GST+applicable payment gateway charges Debit Card/Credit Card/Net Banking द्वारेच Nextenders India Pvt.Ltd. यांचे खात्यामध्ये लॉग इन करताना जमा करावी लागेल.

**12. ई-टेंडर व ई-ऑक्शन आता एकाच पोर्टलवर असल्यामुळे सर्व्हीस प्रोव्हायडर कडुन Alies Name, User ID, Password उपलब्ध करून देण्यात येणार नाही. ई-टेंडर मध्ये सहभाग घेतला आहे अशा सहभागीने ज्या User ID ने ई-टेंडर मध्ये सहभाग घेतला आहे. त्याच User ID ने लॉगिन करून पात्र असल्यास रेतीघाटाच्या ई-ऑक्शन मध्ये बोली लावता येईल.**

**13. ई-टेंडर मध्ये सहभाग घेतलेल्या प्रतिभागीची संख्या जास्त असल्यास ई-ऑक्शन दहा किंवा पंधरा रेतीघाट एका गटामध्ये ठेवुन वेगवेगळे ऑक्शन घेण्यात येईल. अशा प्रकारे ऑक्शन एका पेक्षा अधिक असु शकतात. जर एक प्रतिभागी एकाच वेळी दोन किंवा त्यापेक्षा जास्त वेगवेगळया ऑक्शनसाठी पात्र असला तर तो Simultaneously बोली लावु शकतो. तांत्रिक अडचण किंवा प्रक्रिये संबंधीत सहायता करीता दुरध्वनी क्र.020-25315555, 8879656081 व ईमेल आयडी helpdesk@nextenders.com यांचेशी संपर्क साधावा**

**14.** ई-ऑक्शनसाठी किमान बोली ही रेती घाटाच्या हातच्या किंमतीच्या अधिक रक्कमेसाठी संबंधितास लावावी लागेल. प्रथम बोलीकरिता 90 मिनिटांचा अवधी देण्यात येईल. दिलेल्या 90 मिनिटांपैकी शेवटच्या 15 मिनिटात कोणी बोली वाढविल्यास लिलावधारकास Auto Extention पध्दतीने 15 मिनिटांचा अवधी वाढून मिळेल. वाढीव 15 मिनिटांपैकी शेवटच्या 05 मिनिटात कोणी बोली लावल्यास Auto Extention System नुसार लिलावधारकास आणखी 15 मिनिटांचा अवधी मिळून सदरची प्रक्रिया अविरत (continue) सुरु राहील. सुरुवातीच्या 90 मिनिटात तसेच वाढीव 15 मिनिटांच्या अवधीत कोणतीही बोली प्राप्त न झाल्यास E Auction System Block होईल. त्यानंतर E Tender उघडून सर्वोच्च बोलीधारक निश्चित करण्यात येईल.

**15.** ई-ऑक्शनमध्ये किमान रुपये 20,000/-व त्याच्या पटीतच बोली लावता येईल. संगणकीय प्रणालीमध्ये एक बॉक्स दिसेल त्यामध्ये 1 ते 100 आकडे असतील. तेथे संबंधीत आकड्याच्या दहा पटीने बोली वाढविता येईल. उदा. 20 आकडा निवडल्यास रुपये 4,00,000/-ची बोली लावता येईल. ई-ऑक्शन प्रक्रिया थांबविल्यानंतर/सपंल्यानंतर दुस-या दिवशी सदर वाळुघाट ई-ऑक्शनमधील सर्वोच्च किंमत जाहीर केली जाईल.

**16.** वाळू लिलावासंबंधीचा तारीखनिहाय तपशिल https://co.maharashtra.nextprocure.in आणि www.nanded.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**17.** सर्वोच्च ई-निविदा व ई-लिलावधारकाने विहित मुद्रांक शुल्क, सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, जमा केल्यानंतर करारनामा करण्यात येईल. तसेच वस्तु व सेवाकर विभागाने निश्चीत केलेले GST शुल्क अदा करावे लागेल.

**18.** ई-निविदा व ई-लिलावधारकास गौण खनिजाबाबत शासन निर्णय, दिनांक 03.01.2018 मधील सर्व तरतुदी, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,2013 तसेच पर्यावरण विषयक अनुमतीमध्ये नमुद व वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

**19.** ई-निविदा(e-tendering) अथवा ई-ऑक्शन(e-auction) स्विकारण्याचे वा नाकारण्याचे तसेच तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे ठेवण्यासंबंधीचे अधिकार जिल्हाधिकारी, नांदेड यांनी राखून ठेवले आहेत.

20. ई-निविदेमध्ये रेतीघाटाच्या हातची किंमतीच्या 25 टक्के इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरत असताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- The bidder would remit the funds at least T+1 working day (Transaction + One working day) in advance to the last day
- The bidder would be required to remit the fund within the timelines mentioned in the 'Terms and Conditions' of auction/Tender as detailed in the Brochure/Event Document. In case the bidder fails to make the payment within the stipulated timelines, for any reason whatsoever the Department/Board/Corporations/ Federations / State PSUs its banker/e-procurement service provider could not be held responsible for any such delays in any manner & bidder will not allowed to participate in the e-tender/e-auction.
- It is bidder's responsibility to ensure that RTGS/NEFT payments are made as per the details, as mentioned in the e-challan. In the event of any discrepancy, payment would not be considered and bidder will not be not been allowed to participate in the e-auction/Tender.

**21.** ई निविदा/ई ऑक्शनच्या तांत्रीक बाबीसाठी सहायता करीता दुरध्वनी क्र.020-25315555, 8879656081 व ईमेल आयडी helpdesk@nextenders.com यांचेशी संपर्क साधावा. तसेच कार्यालयीन बाबीविषयी जिल्हा खनिकर्म अधिकारी, श्री.नितेशकुमार बोलोलु (मोबाईल क्रमांक 9422871658) व अवल कारकून श्री.विजय महाजन,(मोबाईल क्रमांक 9881493377) वर संपर्क साधावा.

**22.** ई निविदा व ई ऑक्शन पध्दतीने रेती/वाळू लिलाव करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चीत करण्यात आले आहे.

| Sand E-Tender and E-Auction Schedule for Nanded Collector Office | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Department Stage** | **Start Date** | **Time** | **End Time** | **Time** |
| 1 | Tender Download | 19-03-2019 | 10.00 | 30-03-2019 | 23.00 |
| 3 | Bid Submission | 19-03-2019 | 10.00 | 30-03-2019 | 23.00 |
| 4 | Technical Bid Opening | 01-04-2019 | 11:00 | 01-04-2019 | 17.00 |
| 5 | e-Auction | 03-04-2019 | 11:00 | till end of auction | |
| 6 | Price Bid Opening | after Completion of E-Auction Process | | | |

**दि. 16 मार्च, 2019** **जिल्हाधिकारी, नांदेड**

# <u>नांदेड जिल्हयातील वाळु लिलाव सन 2018-19 अटी व शर्ती</u>

1. ई-निवीदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घेणा-यास संबंधीत कंपनीकडून डिजीटल सिग्नेचर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.
2. Digital Signature मान्यताप्राप्त संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी, त्यासाठी पॅनकार्ड, वाहन परवाना, मोबाईल नंबर, इलेक्शन कार्ड किंवा बँकेचे फोटो असलेले पासबुक तसेच रहिवासी पूराव्यासाठी लाईट बील, टेलीफोन बील इत्यादी साक्षांकीत कागदपत्रे आवश्यक आहेत.
3. **<u>ई-निवीदा/ई-ऑक्शनमध्ये भाग घेणा-यांनी Technical Bid मध्ये पात्र ठरण्यासाठी आयकर नियमित भरत असल्याचा पुरावा (मागील वर्षाचे आयकर विवरणपत्र), पॅनकॉर्ड, GST विभागात नोंदणी केलेला नोंदणी क्रमांक/विक्रीकर विभागाचा TIN क्रमांक □ कागदपत्रे व रेतीघाटाच्या हातची किंमतीच्या 25% रक्कम EMD स्वरुपात भरणे बंधनकारक आहे. ज्या व्यक्ती सदरची कागदपत्रे जोडणार नाहीत त्यांना ई-निवीदा अथवा ई-ऑक्शनमध्ये भाग घेण्याकरीता अव□ ठरविण्यात येईल.</u>** तसेच यासोबत ई-निविदा(e-tendering) प्रक्रियेत भाग घेणा-यांनी त्यांची वैयक्तीक माहिती (जसे, नाव, पत्ता, वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल नंबर) रहिवाशी दाखला, कंपनी/फर्म असल्यास रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, रेतीघाट ई निविदा/ई ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये 100/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र इत्यादि कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.
4. ई-निवीदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घेऊ इच्छिणा-या व्यक्तींना ज्या वाळूगटाची हातची किंमत रुपये 10,00,000/-(रुपये दहा लाख) पेक्षा जास्त असेल अशा वाळू गटांसाठी अर्ज फी रुपये 5,000/- (रुपये पाच हजार) तसेच ज्या वाळूगटाची हातची किंमत रुपये 10,00,000/-(रुपये दहा लाख) पेक्षा कमी असेल अशा वाळू गटासाठी अर्ज फी रुपये 2,000/- (रु. दोन हजार) ऑनलाईन भरावी लागेल.
5. ई-टेंडर/ई-ऑक्शनमध्ये भाग घेऊ इच्छिणा-याने संबंधीत कंपनीस ई-निवीदेसाठी रु.750/-+GST+ applicable payment gateway charges(प्रति रेतीगट) व ई-ऑक्शनसाठी रु.1000/-+GST+ applicable payment gateway charges (प्रति रेतीगट) असे नापरतावा शुल्क ई-पमेंटद्वारे,जसे ई नेट बँकींग/डेबीट कार्ड पध्दतीने भरणा करुन संबंधित वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन खरेदी करावी लागेल.
6. प्रत्येक व्यक्ती/संस्था यांना प्रत्येक वाळुगटासाठी स्वतंत्रपणे ऑनलाईन चार्जेसचा भरणा करावा लागेल.
7. ई-निवीदा/ई-ऑक्शनद्वारे लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणुन अपसेट प्राईसच्या 25% रक्कम नेट बँकींगद्वारे District Collector,Nanded यांचे ICICI बँक खात्याध्ये उपरोक्त नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन जमा करावी लागेल.
8. प्रस्तावीत वाळूगटाच्या लिलावासंदर्भात अन्य काही तक्रारी/आक्षेप/सुचना प्राप्त झाल्यास त्याची तपासणी/ चौकशी केल्यानंतर व लिलाव न करण्याची सबळ कारणे असल्याची जिल्हाधिकारी यांची खात्री झाल्यास लिलावाची प्रक्रीया स्थगीत करण्यात येईल.
9. ई-निवीदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार ई-निवीदा/ई-ऑक्शन/फॉर्म खरेदी/डाऊनलोड /बिड भरणे/बिड समाविष्ट करणे/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रीया विहित वेळेत पुर्ण करणे अत्यावश्यक आहे यांची नोद घ्यावी.
10. वाळु गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या ऑफसेट प्राईस( हातची किंमत) पेक्षा अधिक रकमेची ई-निवीदा/ ई-ऑक्शन ऑनलाईन दाखल करणे आवश्यक आहे.
11. ज्या बोलीदारांची निविदा स्विकारण्यात येणार नाही त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर ऑन लाईन पध्दतीने "ई" निविदा भरतांना दिलेल्या बँक खात्यामध्ये परस्पर ऑनलाईन (Online) जमा केली जाईल.
12. संबंधीत रेती/वाळू स्थळात अपेक्षीत वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळुगटात पाणी आहे किंवा नाही,याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी लिलावात भाग घेणा-याची राहील. याबाबत कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

13. ई निवीदा/ई ऑक्शनमधील संबंधीत वाळुगटाची सर्वोच्च किंमत स्विकारल्यानंतर सर्वोच्च बोलीची व हातची किंमतीची 25% रक्कमेमधील फरकाची रक्कम District Collector,Nanded यांचे ICICI बँक खात्यामध्ये त्याच दिवशी ऑनलाईन जमा करावी लागेल.
14. सर्वोच्च बोलीचा देकार/निविदा स्विकारण्यात आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रक्कमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलावाच्या दिवशी प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे भरावी लागेल. लिलावापुर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम ही सदर लिलावाच्या बोलीच्या 1/4 रक्कमेत समायोजित करण्यात येईल. तसेच, उर्वरित 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासुन 15 दिवसाच्या आत प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे भरणा करावी लागेल. लिलावधारकाने लिलावाच्या बोलीच्या 3/4 रक्कम लिलावाच्या दिनांकापासुन 15 दिवसात भरणार असल्याचे हमीपत्र रु.100/- च्या मुद्राकंनावर सादर करणे आवश्यक राहील .
15. लिलावधारकाने देकाराची उर्वरीत 3/4 रक्कम विहीत कालावधीत न भरल्यास तसेच विहीत कालावधीत करारनामा करुन न दिल्यास त्याला वाळु/रेती गटाचा ताबा देण्यात येणार नाही. अशा लिलावधारकाने शासनजमा केलेली 1/4 रक्कम जप्त करुन अशा रेतीगटाचा फेरलिलाव घेण्यात येईल.
16. दि.01 जुलै 2017 रोजीपासून वस्तु व सेवा कर (**Goods and Service Tax**) लागू झालेला आहे. त्यामुळे वस्तु व सेवाकर कार्यालयाकडून (पुर्वीचे विक्रीकर कार्यालयाकडून)विक्रीकराचे डी.डी. स्वीकारल्या जात नसल्यामुळे तसेच गौण खनिजावर वस्तु व सेवा कर (**G.S.T.**)आकारणी बाबत या कार्यालयास अधिकृतरीत्या कोणतेही शासनाचे आदेश/शासन निर्णय/पत्र/परिपत्रक प्राप्त झालेले नाही. त्यामुळे शासनाकडून वस्तु व सेवा कर (**Goods and Service Tax**) किंवा तत्सम इतर करपात्र देय रक्कम भरणा करणेबाबतचे शासनाकडून, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून किंवा संबंधित विभागाकडून नोटीस प्राप्त झाल्यास वस्तु व सेवाकराची आकारणी केलेली विहित रक्कम (**Goods and Service Tax**) किंवा तत्सम इतर करपात्र देय रक्कम शासनास भरणा करण्याची हमीपत्र देणे बंधनकारक राहील.
17. लिलावधारकास रुपये 5000/- (रुपये पाच हजार) इतक्या रकमेचा उपसंचालक महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, औरंगाबाद यांच्या नावे काढण्यात आलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी,डी,) सर्वेक्षण शुल्कापोटी जमा करावा लागेल.
18. लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ हातच्या किंमतीच्या 20% एवढी अनामत रक्कम प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे भरणा करावी लागेल. ही रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशतः अथवा पुर्णतः जप्त करण्यात येईल.
19. लिलावधारकास पर्यावरण शुल्कापोटी, सर्वोच्च किंमतीच्या 2% रक्कम ही बँक गॅरंटीच्या स्वरुपात पर्यावरण शुल्क म्हणून दयावी लागेल. त्याने लिलावातील अटी/शर्तीचा भंग केल्यास सदरची रक्कम जप्त करुन त्यांचेवर नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल.
20. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, यांची अधिसुचना क्र.एमडीएफ-0615/सिआर34 / आयएनडी-9.दि.01/09/2016 अन्वये दि.27 मार्च, 2015 रोजी अधिसुचित झालेल्या खाण व खनिजे (विकान व विनियमन) संशोधित अधिनियम-2015 नुसार राज्य शासनाने कलम 9 (ब) व(1) नुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठानांची स्थापना करण्याचे निर्देशित दिले आहे. त्यानुसार नांदेड जिल्हयात जिल्हा खजिन विकास प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील अस्तित्वात असलेल्या गौण खनिजांच्या खाणपट्टाधारकांकडुन देखील जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत गौण खनिज स्वामित्वधनाचे 10 टक्के रक्कम जमा करण्याचे शासनाव्दारे निर्देशित केलेले आहे. सदर गोळा होणारा निधी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेतंर्गत केंद्र शासनाने सप्टेंबर, 2015 मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार खाणींतील खाणकामामुळे बाधित क्षेत्रांच्या पायाभुत सुविधांकरीता वितरीत करण्याचे निर्देशित केले आहे. त्यानुसार

आपणास रेती लिलावातील सर्वोच्च बोलीच्या व्यतिरिक्त एकुण सर्वोच्च बोलीच्या 10 टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठान या खात्यावर धनाकर्षाव्दारे जमा करावी लागेल.

21. यशस्वी लिलावधारकासोबत वाळु/रेतीच्या लिलावाच्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे लिलावाची रक्कम रु.10 लाखापर्यंत असल्यास लिलावाच्या 0.1 टक्का किंवा रु.100/- यापैकी जे अधिक असेल तेवढे मुद्रांक शुल्क व लिलावाची रक्कम रु.10 लाखापेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रक्कमेवर 0.2 टक्के मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधीत लिलावधारकाने भरणे आवश्यक राहील.

22. ज्यावेळी लिलाव रद्द करण्यात येईल,त्यावेळी त्या वाळू क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास, फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

23. लिलाव मंजुरीचे आदेश निर्गमित केल्यानंतर लिलावधारकाने वाळुगटाचा ताबा सात दिवसांच्या आत घेतला पाहीजे व वाळुगटाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील.

**24.** मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.4830/2010 मधील दि.26.10.2010 च्या निर्णयान्वये ठरवून दिलेल्या निकषानुसार,वाळू गटाशी संबंधित तहसिलदार यांनी उत्खननाचा अहवाल प्रत्येक आठवड्याला जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. तसेच महिण्याच्या दुस–या व चौथ्या रविवारी उत्खनन बंद ठेवावे. व उत्खनन बंद असलेल्या दिवशी तहसिलदार यांनी वाळू गटाचे निरीक्षण करावे व त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. सबब, लिलावधारकांनी सदर बाबीची नोंद घ्यावी.

25. लिलावधारकास, त्यांच्या मंजुर क्षेत्रातील ज्या ठिकाणातून वाळू काढण्याने जमिनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारा जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतीम असेल.

26. भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमिनी लिलावधारकास देण्यात आलेल्या क्षेत्रालगत असल्या तरी त्या ठिकाणाहून वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते पायवाट म्हणुन वापरण्यात येणा-या जमीनीतून वाळू काढता येणार नाही.

27. कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फुट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

28. वाळूचे उत्खनन करतांना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायीत्व लिलावधारकावर राहील.अशा हानी/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसुलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

29. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजुर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतु, लिलावधारकास दिलेल्या अटी व शर्तींचा तसेच शासनाच्या नियमांचा भंग न करताही जर शासनाने लिलावाची मुदत संपण्यापूर्वी काही कालावधीसाठी ठेका रद्द केला, तर त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला असेल त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रक्कम परत करतांना लिलावातील देकाराची रक्कम, लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानूसार परताव्याच्या रकमेची परीगणना करण्यात येईल.

30. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, ज्या जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी लिलाव केला असेल त्याच जिल्ह्यात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. ते ठिकाण नदीपात्रापासून 200 मीटरपेक्षा अधिक अंतरावर नसावे. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अशाप्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. यासाठी लाकडी/तारेचे/लोखंडी/ भिंतीचे/दगडाचे कुंपण किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदके/चर खोदणे आवश्यक असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळू/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळू/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही.

31. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि-10/0216/प्र.क्र.158.दि.22/03/2016 नुसार वाळु वाहतुकी बारकोडयुक्त पावत्याचा वापर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार नांदेड जिल्हयात बारकोड युक्त वाहतुक पास देण्यात येणार आहे. सदरील बारकोडयुक्त प्रत्येकी एका पावतीवर 02 ब्रास व 01 ब्रास वाळुसाठयाच्या वाहतुकीकरीता निर्गमित करण्यात येतील. सदरील मंजुर केलेल्या रेती साठयानुसार बारकोड वाहतुक पावत्यासाठी येणारा जो काही खर्च होईल तो लिलावधारकास अदा करावा लागेल. निर्गत केलेल्या बारकोडयुक्त पावत्याचा हिशोब दरमहा 05 तारखेस सादर करणे बंधनकारक असेल.

32. वाळू/रेतीची वाहतूक करणा-या वाहन चालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून नियुक्त भरारी पथकाकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तींकडून केली जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,1966 मधील कलम 48(7) व (8), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 आणि शासन निर्णय, दिनांक 03.01.2018 मधील निर्धारित तरतुदीनुसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

33. परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौण खनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी अवल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

34. अंदाजीत परिमाणापेक्षा अधिक वाळुसाठा रेतीगटात असल्यास, त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजीत परीमाणापेक्षा लिलावधारकास अधिक उत्खनन करता येणार नाही. परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तर नमुद अंदाजीत वाळुसाठयापैकी वाळु कमी भरल्यास त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

35. लिलावधारकाने जिल्हा परिषद कर/पंचायत कर विहित केल्याप्रमाणे अदा करावा

36. जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चीत करुन दर्शविण्यात यावी. लिलावधारकाने त्याला मंजुर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य आहे. स्वत:चे

तसेच सक्षम प्राधीका-यांच्या पुर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नाव, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

37. **वाळु/रेती लिलावाचा कमाल कालावधी एक वर्षाचा राहील व तो सर्वसाधारणपणे दिनांक 01 ऑक्टोबर ते पुढील वर्षाच्या 30 सप्टेंबर पर्यंत असेल. लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलावाचा कालावधी वर्षाच्या 30 सप्टेंबर रोजी संपुष्टात येईल. लिलावाची मुदत 30 सप्टेंबर रोजी संपुष्टात येणार असला तरीही लिलावाचा कालावधी काहीही असला तरीही रेतीघाटाचा प्रत्यक्ष ताबा दिल्यानंतर खालीलप्रमाणे रेती उत्खननाचा कालावधी देण्यात येईल**

**अ) 3000 ब्रासपर्यंतच्या परिणामाचे वाळुगटाचे लिलाव, 3 महिने किंवा 30 सप्टेंबर,2019 यापकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी देण्यात येईल.**

**आ)3000 ते 4500 ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळुगटाचे लिलाव, 4½ महिने किंवा 30 सप्टेंबर, 2019 यापकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी देण्यात येईल.**

**इ) 4501 ते 6000 ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळुगटाचे लिलाव, 6 महिने किंवा 30 सप्टेंबर, 2019 यापकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी देण्यात येईल**

**ई) 6001 ब्रास व त्यावरील परिमाणाच्या वाळुगटाचे लिलाव दि. 30 सप्टेंबर, 2019 पर्यंतच्या कालावधीकरीता करण्यात येतील.**

38. **तथापि अशा पध्दतीने लिलावाचा कालावधी निश्चीत करत असताना पाण्याखालील वाळुगटामध्ये दिनांक 10 जुन ते 30 सप्टेंबर या कालावधीमध्ये वाळु उत्खनन करता येणार नाही.**

39. नदीपात्रातील वाळु थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चीत करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळुचे उत्खनन करता येणार नाही. निश्चीत केलेले बेंच मार्क पडणार नाहीत. तसेच नदीपात्रातील वाळुच्या थराच्या आधारे आजुबाजुच्या विहीरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेणे आवश्यक राहील.

40. लिलावात दिलेल्या क्षेत्रातून करारात नमुद केलल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहायानेच वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षीत साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळु स्थळात पाणी आहे, अशा तसेच मानवी वा नैसर्गीक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परीस्थीतीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत शासन जमा केलेली वाळूगटाची रक्कम परत केली जाणार नाही.

41. उत्खनन केलेल्या गौण खनिजाचे वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. वाहतुकीसाठी वेगळे रस्ते शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच आवश्यकता असल्यास वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत वाळु उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा वाळुगट बदलुन दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत शासन जमा केलेली वाळूगटाची रक्कम परत केली जाणार नाही. वाहतूकीसाठी खाजगी जमीनीतून रस्ता मिळविण्याची जबाबदारी ही लिलावधारकाची राहील.

42. लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळु वाहतुकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळुगटामधुन उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवुण विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतुकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॉलीचा वापर करावा. वाळु डेपोमध्ये सीसीटिव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवडयात तहसिलदार यांना सादर करावे लागेल. शासन निर्देशानुसार डेपो परवानगीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

43. वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केलेले असेल त्या क्षेत्रातून वाळु उत्खनन करतांना नैसर्गीक संपत्ती व पर्यावरणास धोका होणार नाही याची खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

44. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी निकामी वाळूचे साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

45. लिलावधारकाने सिलटेशन (Siltation) अभ्यासाबाबतचा अहवाल वाळू उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी तज्ञ एजन्सी, जसे NIO/CWPRS मार्फत करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे सादर करावा लागेल.

46. लिलावधारकाने मंजूर क्षेत्रापैकी कमीत कमी 20 टक्के क्षेत्रामध्ये नदीतीरावर तसेच गावातील वाहतूक रस्त्यावर CPCB Guideline नुसार स्थानीक वन अधिकारी व फलोत्पादन अधिकारी यांचे मदतीने झाडे लावून हरीयाली (Greenbelt) करावी लागेल.

47. लिलावधारकाने कासव प्रजनन क्षेत्रात वाळुचे उत्खनन करु नये.

48. लिलावधारकाने उत्खननाच्या वेळी Soil Erosion व Silt Management बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यात याव्यात.

49. लिलावधारकाने उत्खननाच्या जागेवर तात्पुरते निवास व  वैद्यकीय प्राथमीक उपचार सुविधा उपलब्ध करुन दयावी. तसेच मजुरांच्या पिण्याचे पाण्याची व फिरते शौचालयाची व्यवस्था करावी.

50. लिलावधारकाने वार्षिक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा.

51. लिलावधारकाने वाळूचे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने सर्वेक्षणात विहित केलेल्या किंवा पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोलीत उत्खनन करु नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी घ्यावी. तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने दिलेल्या प्रमाणपत्रातील नकाशाप्रमाणे दर्शविलेल्या हद्दीतूनच वाळूचे उत्खनन करणे बंधनकारक राहील. दिलेल्या हद्दीबाहेर उत्खनन केल्यास ते अवैध उत्खनन समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

52. लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहचविता कामा नये.

53. वाळू उत्खनन करतांना अथवा हलवितांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलील ठाण्यात तसेच जिल्हाधिकारी कार्यालयास दयावी.

54. लिलावधारकांनी त्यांना मंजूर केलेल्या वाळुगटातून केलेल्या वाळूचे उत्खनन, विक्री व साठा केल्याबाबत दैनंदिन हिशोब ठेवावा. तसेच दर महिन्याच्या 05 तारखेपर्यंत, अगोदरच्या महिन्याचा मासिक अहवाल, जिल्हाधिकारी कार्यालय,तहसिल कार्यालय यांना सादर करावा.

55. लिलावधारकाने लिलावाच्या अटी व शर्ती तसेच केंद्र शासनाच्या वन व पर्यांवरण विभागाकडील दिनांक 24.12.2013 मधील ऑफीस मेमोरँडम तसेच महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 व वाळू निर्गती धोरण, शासन निर्णय दि.03.01.2018 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याच प्रमाणे वाळुचा पुर्ण उपयोग गौणखनिज म्हणूनच केला पाहिजे. अवैध वाळु उत्खनन/साठा/वाहतुक प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मधील 48(7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

56. वाळुचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने संबंधीत तहसिलदार, उपविभागीय अधिकारी  तसेच जिल्हाधिकारी, नांदेड यांना तात्काळ कळविले पाहीजे.

57. सार्वजनिक पाणवठा/पाणीपुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्राणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

58. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादीत करुनच वाळूची वाहतुक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

59. लिलावधारकाने वाळु उत्खनन करतांना होणारे प्रदुषणासंबंधी, प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

60. मा.न्यायालयाने कोणत्याही वाळुघाटाबाबत काही आदेश/निर्णय दिल्यास,सदर आदेश/निर्णय लिलावधारकावर बंधनकारक राहतील व मा.न्यायालयाचे आदेश/निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

61. नदीपात्रात निश्चीत केलेल्या वाळुगटातुन वाळुचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळु/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळु वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी अशा प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.

62. वाळू उत्खननासाठी सक्शन पंपाचा वापर अनुज्ञेय नाही. तसेच नदीच्या प्रवाहातुन सुरु असेल वाळु उत्खनन करता येणार नाही.

63. शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय लिलावधारकास ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा निविदा उघडुन मंजूर केल्यानंतर भागीदारही घेता येणार नाही.

64. वाळुचे उत्खनन व वाहतुक केवळ सकाळी 06.00 ते सायंकाळी 06.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन व वाहतुक अवैध समजुन कारवाई करण्यात येईल.

65. (अ) शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार लिलाव करण्यात आलेल्या वाळुघाटाबाबत कालांतराने लिलावाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होते. अवैध व नियमबाहय वाळु उत्खननामुळे नदीकाठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परीणाम होतो. वाळूच्या वाहतुकीमुळे नदीकाठच्या शेतीच्या रस्त्यांची हानी होते. अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थांकडून करण्यात येतात. अशा तक्रारीची दखल घेऊन त्या संदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील अधिका-यांचा समावेश असलेली समिती राहील

| | | |
|---|---|---|
| (1) | जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी | - अध्यक्ष. |
| (2) | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - सदस्य |
| (3) | सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता | - सदस्य |
| (4) | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे जिल्हयातील किंवा यथास्थिती विभागातील वरीष्ठ अधिकारी | - सदस्य |
| (5) | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी | - सदस्य |
| (6) | जिल्हा खनिकर्म अधिकारी, नांदेड | - सदस्य सचिव |

(ब) लिलावात घेतलेल्या वाळू गटातुन लिलाव धारकास उत्खनन करण्यास विरोध झाल्यास किंवा नैसर्गीक किंवा लिलावधारकाच्या नियंत्रणाबाहेरील सबळ कारणामुळे उत्खनन होऊ शकले नाही तर लिलावधारकाने जिल्हास्तरीय समितीसमोर तक्रार अर्ज करुन ती बाब निदर्शनास आणावी. जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांनी याबद्दल चौकशी करुन त्याबद्दलची वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणुन देतील.

(क) जिल्ह्यातील एखाद्या वाळुगट संदर्भात वरील स्वरुपाच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्यास उपरोक्त समिती अशा वाळूगटांना प्रत्यक्ष भेट देऊन त्या वाळू गटाचे पुन:श्च सर्वेक्षण करेल. तसेच तक्रारीतील अन्य मुदयांबाबत स्थानिक चौकशी करील व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय करुन त्याबाबतच्या निष्कर्षाचा अहवाल अध्यक्षांना सादर करेल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यांनतर संबंधीत वाळू गटातून वाळूचे उत्खनन चालु ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत अध्यक्ष 10 दिवसांत उचित निर्णय घेतील व तो निर्णस संबंधीत लिलावधारक, तक्रारदार व क्षेत्रीय महसूल अधिकारी यांना कळविल.

(ड) ज्या तक्रारदारास समितीच्या अध्यक्षांचा निर्णय मान्य नसेल अशा तक्रारदाराला याबाबत मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे अपील करता येईल. ते समितीचा अहवाल व अध्यक्षांचा निर्णय याचा फेरविचार करुन कोणत्याही परीस्थितीत 10 दिवसांत निर्णय घेतील. सदर निर्णय संबंधीत तक्रारदार व

जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल.मा.विभागीय आयुक्त यांनी घेतलेला निर्णय मान्य नसल्यास शासनाकडे अपील करता येईल.

66. नदीपात्रातील काही वाळू गटांचा लिलाव करण्यास व्यापक विरोध झाल्यास अशा वाळू स्थळांच्या संदर्भात अंतीम निर्णय घेण्यासाठी महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनी-10/ 0610 /प्र.क्र.281/ख, दि.26.05.2011 अन्वये गठीत केलेली मंत्री मंडळाची उपसमिती निर्णय घेईल.

67. अवैध उत्खनन/वाहतुकीची प्रकरणे उघडकीस आल्यास अशा प्रकरणी संबंधीत ठेकेदार/लिलावधारक/ वाहनमालक-वाहनचालक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करतांना संबंधीतांविरुध्द भारतीय दंड विधी संहिता कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल करणे, वाहन जप्त करणे, दंडात्मक कारवाई करणे, फौजदारी स्वरुपाची कारवाई करणे इत्यादी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल.

68. लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या क्षेत्रामधील/क्षेत्रालगतच्या वन्य प्राण्यांचे/पक्षांचे अस्तीत्वास तसेच त्यांच्या निवासास इजा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.

69. लिलावधारकाने वाळु उत्खनन करतांना मा.सर्वोच्च न्यायालय तसेच नॅशनल ग्रीन ट्रीब्युनल यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

70. लिलावधारकाने नदीचा प्रवाह,गती,गढूळता यांच्या स्वरुपात बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच वाळुचे उत्खनन करतांना नदीतील मातीच्या गुणधर्मांवर परीणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

71. वाळु वाहतुक करणारी वाहने रहिवासी भागात उभी करु नयेत.

72. वाळुची वाहतुक करणा-या वाहनांना एकाच प्रकारचा रंग देण्यात यावा. त्यामुळे वाळु वाहतुकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले ट्रक वापरण्यात येईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

73. रेती लिलावधारक यांनी स्वखर्चातुन रेतीची वाहतुक करणा-या वाहनांना GPS (जीपीएस) यंत्रणा बसवावी लागेल. त्याची संनियत्रणाची सुविधा जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध करुन द्यावी लागेल.

74. वाळुची वाहतुक करणा-या वाहनांचे सक्षम प्राधीकरणाने दिलेले Pollution Under Controll प्रमाणपत्र वाहनासोबत बाळगणे आवश्यक आहे.

75. लिलावधारकाने वाळु उत्खनन करीत असतांना पाण्याचा उपसा करणे आवश्यक असल्यास त्यासाठी संबंधीत विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

76. लिलावधारकाने वाळु उत्खननामुळे खराब झालेल्या पाण्यावर Moef/ MPCB च्या तरतुदीनुसार प्रक्रीया करावी.

77. लिलावधारकाने मंजुर क्षेत्रातील Ambient Air Quality Monitoring माहे जानेवारी, एप्रिल, नोव्हेंबर, महिन्यात करावी. तसेच वाहनाच्या धुळीमुळे प्रदुषण होऊ नये म्हणुन Water Sprinkling करणे बंधनकारक आहे.

78. लिलावधारकाने CPCB च्या नियमानुसार Noise Level Controling करावे.

79. लिलावधारकाने प्रत्येक वाळुगटाच्या ठिकाणी 24/7 छायाचित्रण होण्यासाठी CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा वाहतुकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळु भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा व वाळुगटातील वाळुची वाहतुक करणारी सर्व वाहने ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळुगटाच्या ठिकणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना सोसणे आवश्यक राहील.लिलावधारकाने बसविलेल्या CCTV चा Adress जिल्हाधिकारी कार्यालयाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळु उत्खनन व वाहतुकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर 15 दिवसानी तहसिलदार कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील व सदरील सीडी एक प्रत मासिक अहवालासोबत संबंधीत तहसिलदार यांचेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील.

80. लिलावधारकाने वन्यजीव आवास क्षेत्रासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन करु नये.

81. लिलावधारकाने त्यांना मंजुर क्षेत्रात जाण्या येण्यासाठी एकच मार्ग/रस्ता ठेऊन इतर सर्व मार्ग/छोटे रस्ते इ. बॅरीकेडसने बंद करावेत.
82. लिलावधारकाने त्यांच्या लिलाव क्षेत्रात येणा-या प्रत्येक वाहनांची नोंदणी संबंधीत तहसिलदार यांचेकडे करावी.
83. वाळुचे अनाधिकृत उत्खनन व वाहतुक टाळणेसाठी जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशाचे पालन लिलावधारकास करणे बंधनकारक राहील.
84. वाळुचे उत्खनन करत असताना किंवा रेतीघाटावर जाण्यासाठी वाहनांना रस्ता तयार करण्यासाठी झाडे तोडता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास संबंधीताविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
85. नैसर्गिक / मानवनिर्मित पुरातत्त्विक स्थळांच्या परिसरात कोणतेही वाळुचे उत्खनन केले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
86. नदीची रुंदी 3 मीटर किंवा रुंदीच्या 10 टक्के यापैकी जे जास्त अंतर असेल ते ग्राहय धरुन वाळु उत्खनन करु नये.
87. लिलावधारक यांना मा.राष्ट्रीय हरित लवाद, मा.सुप्रिम कोर्ट, मा.उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे उल्लघंन होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील( उदा. Particularly, the directions given by Hon'ble Supreme Court of India vide order dated.27.02.2017 in Deepak Kumar case[SLP(C)] Nos.19628-19629 of 2009] and order dated 05.08.2013 of the Hon'ble National Green Tribunal in application no.171/2013 be strictly followed.)
88. लिलावधारक यांनी राज्यस्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) यांनी 156 व्या बैठकीमध्ये 29 रेतीगटांना राज्यस्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) च्या दि.19/02/2019 पत्रान्वये पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. सदरील पर्यावरण अनुमतीमध्ये नमुद अटी/शर्तीचे पालन करणे बंधनकारक असेल.
89. केंद्र शासनाच्या MOEF & CC यांचेकडील वाळु उत्खननासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे, तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व नियमन) नियम 2013 मधील तरतुदी व शासन निर्णय दि.03/01/2018 मधील सुचनाचे पालन करणे बंधनकारक राहील.
**90. ई-निवीदा/ई-ऑक्शन मधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे, ई-निवीदा/ई-ऑक्शन प्रक्रीयेत वेळेवर निर्णय घेण्याचे, रद्द करण्याचे तसेच ई-निवीदा/ई-ऑक्शन मधील सर्वोच्च किंमत स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा, तसेच Technical Bid मध्ये नमुद केलेल्या कागदपत्राच्या तपासणीचे अधीन राहुन पात्र किंवा अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी,नांदेड यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे. दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.**
91. "ई"निविदा, "ई"ऑक्शनमध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती/संस्थेस राज्यस्तरीय पर्यावरण आघात व्यवस्थापन प्राधिकरण (SEIAA) यांनी निर्गमीत केलेल्या पर्यावरण अनुमतीत नमुद सर्व अटी/शर्ती बंधनकारक राहतील. सदरील अनुमतीची प्रत www.nanded.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
92. वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**दिनांकः- 16 मार्च, 2019** **जिल्हाधिकारी, नांदेड**

**रेतीघाट ई निविदा/ई ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये 100/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

**शपथपत्र**

मी, (पूर्ण नाव) ---------------------------------------------------------------------

राहणार(पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा) -------------------------------------------------------

ता. -------------------------------------- जिल्हा ----------------------------------------

माझे/माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक----------------- GST नं. ----------------

मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी मौजे . . . . . .  . . . ता. . . . . . . . येथील वर्ष 2018-19 साठीच्या रेती लिलावाच्या अनुषंगाने स्थानिक वर्तमानपत्रात . . . . . . . . . वेबसाईटवर प्रसिध्द झालेल्या ई निविदेतील सर्व अटी व शर्तींची माहिती करुन घेतली आहे व मी निविदेत प्रस्तावित केलेल्या किंमतीत उक्त रेती घाट घेण्यास इच्छूक असून त्याची सदरील रेतीघाटाच्या हातच्या किंमतीच्या 25% रक्कम रु............................. शासन जमा करीत आहे.

मला सदर रेती घाट मंजूर झाल्यास, लगेच भरणे आवश्यक असलेल्या लिलावातील सर्वोच्च बोलीच्या 25% रक्कमेपैकी वर नमुद EMD वजा जाता शिल्लक राहणारी रक्कम लिलाव मिळताच मी भरेल. लिलावात मंजूर करण्यात आलेल्या किंमतीच्या उर्वरित रक्कम मी 15 दिवसांच्या आत चालानद्वारे शासन जमा करुन मंजूर रेती घाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. सदरची रक्कम मुदतीत भरण्यास मी कसूरदार ठरल्यास मी जमा केलेली 25% (EMD) रक्कम शासन जमा करण्यास माझी हरकत नाही.

तसेच नियमानुसार फेर निविदेद्वारे दुस-या निविदा धारकास सदरचा रेती घाट मंजूर केल्यास माझी काही हरकत राहणार नाही. फेर निविदेद्वारे शासनाच्या महसुलाचे काही नुकसान झाल्यास, सदर नुकसानीची भरपाई जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यास मी संमती देत आहे.

फेर निविदेत पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या लिलावाच्या रक्कमेपेक्षा अधिकची रक्कम आल्यास आधीकच्या रक्कमेवर माझा काहीही अधिकार राहणार नाही.

मी असेही घोषित करतो की, सदरहू रेती घाट आणि रेती घाटास जाणारे पोच/गाव रस्ते इत्यादिची मी पाहणी केली आहे,त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती वाहतुकीसाच्या योग्यतेबाबत मी भविष्यात कोणताही आक्षेप/वाद उपस्थित करणार नाही.

ठिकाण ----------------
दिनांक -----------------

(                    )
अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

1. पूर्ण नाव ---------------------------------------------- स्वाक्षरी ----------------
   पत्ता ------------------------------------------------------------------------

2. पूर्ण नाव ---------------------------------------------- स्वाक्षरी ----------------
   पत्ता ------------------------------------------------------------------------

## सन 2018-19 मध्ये होणा-या रेती ई टेंडरींग घाटांचा तपशिल (तिसरी फेरी)

| अ. क्र. | तालुका | गावाचे नाव | Name of Spot | नदी | लगतचे गट नं. | रेती साठा (sand deposition in meter) | क्षेत्रफळ मीटरमध्ये (लांबी×रुंदी× खोली) | क्षेत्र हेक्टर मध्ये | लिलावासाठी उपलब्ध अंदाजे रेती साठा (ब्रास मध्ये) | सन 2018-19 निश्चीत हातची किंमत (Offset Price) | लिलावात भाग घेण्याकरिता भरावयाची अनामत रक्कम | Tender Fee |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | हदगाव | बेलमंडल | Belmandal | पैनगंगा | 1, 5, 9 | 2.60 | 200x30x0.60 | 0.60 | 1272 | 2938320 | 734580 | 5000 |
| 2. | हदगाव | गुरफळी | Gurfali | पैनगंगा | 5,6,7,11,12,13,14,15, 16,17,18,19, 26,27, 28,29, 31,33,34,35, 36 | 2.60 | 400x40x0.60 | 1.60 | 3392 | 7835520 | 1958880 | 5000 |
| 3. | हदगाव | बनचिंचोली | Banchincholi | पैनगंगा | 139/1/A, 139/B, 139/3, 140/A, 140/A/1, 144 | 2.50 | 250x50x0.50 | 1.25 | 2208 | 5100480 | 1275120 | 5000 |
| 4. | हदगाव | मनुला (बु) | Manula (Bu.) | पैनगंगा | 308, 310, 311, 312, 313 | 2.50 | 180x40x0.50 | 0.72 | 1272 | 2938320 | 734580 | 5000 |
| 5. | हि.नगर | घारापूर | Gharapur | पैनगंगा | 72, 73, 76 | 2.50 | 180x40x0.50 | 0.72 | 1272 | 2938320 | 734580 | 5000 |
| 6. | हि.नगर | दिघी-2 | Dighi-2 | पैनगंगा | 3/1,3/2,4/1,5/1,5/5,11/1,12/4,13/ 3,54/1/बी, 55/2 | 2.50 | 200x50x0.50 | 1.00 | 1767 | 4081770 | 1020443 | 5000 |
| 7. | हि.नगर | दिघी-1 | Dighi-1 | पैनगंगा | 27/4, 27/6, 26/6 | 2.50 | 200x50x0.50 | 1.00 | 1767 | 4081770 | 1020443 | 5000 |
| 8. | हि.नगर | रेणापूर(बे.) | Renapur Be | पैनगंगा | 80, 81 | 2.50 | 140x40x0.50 | 0.56 | 989 | 2284590 | 571148 | 5000 |
| 9. | देगलुर | शेवाळा | Shewala | मांजरा | 90, 92, 352 | 2.70 | 325x75x0.70 | 2.44 | 6029 | 24429508 | 6107377 | 5000 |
| 10. | देगलुर | शेळगाव-1 | Shelgaon-1 | मांजरा | 134, 135, 136 | 2.70 | 200x70x0.70 | 1.40 | 3463 | 12536060 | 3134015 | 5000 |
| 11. | देगलुर | शेकापूर | Shekhapur | मांजरा | 144, 145, 146 | 2.50 | 425x90x0.50 | 3.83 | 6758 | 20301032 | 5075258 | 5000 |
| 12. | बिलोली | हुणगुंदा | Hungunda | मांजरा | 210,211,242, 243, 254, 255, 256 | 2.80 | 300x80x0.80 | 2.40 | 6784 | 15671040 | 3917760 | 5000 |
| 13. | बिलोली | नागणी | Nagani | गोदावरी | 118,117,120,140,141,142 | 2.50 | 250x80x0.50 | 2.00 | 3534 | 8163540 | 2040885 | 5000 |
| 14. | बिलोली | येसगी-1 | Yesagi-1 | मांजरा | 231 | 2.90 | 200x90x0.90 | 1.80 | 5724 | 13222440 | 3305610 | 5000 |
| 15. | बिलोली | येसगी-2 | Yesagi-2 | मांजरा | 233 | 2.75 | 200x90x0.75 | 1.80 | 4770 | 11018700 | 2754675 | 5000 |

**दि. 16 मार्च, 2019** **जिल्हाधिकारी नांदेड**